प्रेस नोट ता. १०/११/२०२३

# दोन पिस्टलांसह सराईत गुन्हेगारांना अटक

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

दिनांक ०९/११/२०२३ रोजी गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व अंमलदारांसह पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये अवैध शस्त्र बाळगणा-या गुन्हेगारांची माहीती घेत असतांना पोनि कदम यांना बातमीदाराकरची बातमी मिळाली कि, दोन सराईत रेकॉर्डवरील गुन्हेगार कमरेला पिस्टल लावुन दापोडी परिसरात फिरत आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाली.

गुन्हे शाखा पोलीस उप आयुक्त स्वप्ना गोरे व सहा.पोलीस आयुक्त सतिश माने यांना याबाबतची माहीती कळवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे एक पथक तयार करुन सदर पथकाला सुचना व मार्गदर्शन करुन तात्काळ दापोडी भागात रवाना केले व संशयितांचा शोध घेतला असता सदर गुन्हेगार हे फुगेवाडी अल्फा लावल कंपनीजवळ थांबले असल्याची माहीती काढुन त्या परिसरात सापळा लावला. बातमीदाराने सांगितलेल्या वर्णनाचे इसम कंपनीच्या भिंतीलगत बोलत थांबले असल्याचे पोलीस पथकाचे निदर्शनास आले त्याचवेळी सदर संशयित इसम हे पळुन जाण्याची तयारी करीत असतांना पोलीस पथकाने अत्यंत शिताफीने त्यांना पकडले. त्यांची नावे १) मुनाफ रियाज पठाण वय २७ वर्षे, रा. नानापेठ पुणे व २) देविदास उर्फ देवा बाळासाहेब गालफाडे वय २७ वर्षे रा. कळसमाळवाडी रामगडवस्ती विश्रांतवाडी पुणे अशी असल्याची सांगितली. दोन्ही इसमांचे अंगझडतीमध्ये कमरेला लावलेली दोन पिस्टल व दोन जिवंत काडतुसे मिळुन आली.

इसम नामे मुनाफ रियाज पठाण वय २७ वर्षे, रा. नानापेठ पुणे व २) देविदास उर्फ देवा बाळासाहेब गालफाडे हे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असुन त्यांचेवर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यांचा पिस्टल जवळ बाळगण्याचा नक्की काय उदेश होता, पिस्टल हत्यार नक्की कोठून व कोणत्या कारणासाठी आणले, पिस्टल हत्यार कोणाला विक्री करणेसाठी आले होते का याबाबत सखोल तपास गुन्हे शाखेकडून करुन आरोपींचे विरुध्द गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस कॉस्टेबल बक्कल नंबर १९२० अजित आण्णा सानप यांची सरकार तर्फे भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३ (२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे फिर्याद घेवून भोसरी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ. श्री संजय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त गुन्हे स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री सतिश माने यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री जितेंद्र कदम, पोलीस उप निरीक्षक गणेश माने, पोलीस अंमलदार दिलीप चौधरी, शिवानंद स्वामी, उषा दळे, देवा राऊत, नामदेव कापसे, आतिष कुडके, विपुल जाधव, अजित सानप, शिवाजी मुंढे, उध्दव खेडकर, यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड